Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# दलित कवयित्रिंची वाटचाल

**डॉ. ज्योती शरद इंगळे,** जनता कला वाणिज्य महाविद्यालय मलकापूर

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने लोकशाही शासन प्रणाली स्वीकारली. शिक्षणाचा प्रचार व प्रसार झपाट्याने झाला. शिक्षणाने समाज जागृत झाला. चळवळीच्या माध्यमातून तसेच साहित्यात आपले प्रश्न मांडले. साहित्यातून मनोरंजन न होता सामाजिक प्रश्न येत गेले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्यामधून जीवनातील प्रश्न मांडले जाऊ लागले. भारतीय संस्कृती पुरुषप्रधान आहे. इथे स्त्रियांना दुय्यम समजले जाते. साहित्यातून पुरुषांनी स्त्रीरूपाच्या प्रतिमा निर्माण केल्या. वेगवेगळ्या क्षेत्रात स्त्री अग्रेसर आहे. 'चूल आणि मूल' तिचे कार्यक्षेत्रात मागे पडले. तिचे पारंपारिक रूपही पालटले. स्त्रियांमध्ये चेतना निर्माण होण्यास स्त्रीमुक्ती चळवळ कारणीभूत ठरली.

दलित साहित्यात कविता या वाङ्मय प्रकारप्रकाराचे विपूल लेखन झालेले दिसून येते. दलित साहित्यात स्त्रीयांनी कविता वाङ्मय प्रकार विशेष हाताळला आहे. स्त्रीच्या वाट्याला येणारे दुःख हे विदारक स्वरूपाचे असणे स्वाभाविक आहे. स्त्रियांना आपले दुःख, भावनांना वाट मोकळी करून देण्याचे जवळचे माध्यम त्यांना कविता वाटते व कवितेला त्यांनी आपली जीवाभावाची सखी माणून तिच्याजवळ आपले मन मोकळे केले आहे.

दलित कवितेचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. दलित कवितेतून वेदना, विद्रोह , नकार, दाहक वास्तव अविष्कृत होते. दलित कवितेने नवे अनुभवविश्व, नव्या संकल्पना, नवी क्रांती, नव समाजव्यवस्था या क्रांतिकारी विचारांची प्रेरणा कवितेतून होताना दिसते. दलित कवयित्रींनी विपुल कविता लेखन केले आहे. कमी शब्दात भव्य आशय व्यक्त करण्याची ताकद कवितेत असते. दलित कवयित्रिंच्या वाट्याला आलेले सर्व अनुभव त्या कवितेतून मांडतात. दलित कवयित्रींची कविता ही वास्तवाची जाणीव करून देणारी आहे.

दलित स्त्री पददलित आहे. तिच्या वाट्याला दुहेरी शोषण आलं आहे. एक म्हणजे दलित म्हणून तर दुसरे म्हणजे स्त्री म्हणून अशा दुहेरी शोषणाने होरपळलेल्या दलित स्त्रीला स्वतः चाआवाज गवसला आणि तिच्या हाती लेखणी आली. आपल्या भावना, विचार, कल्पना, दुःख, हाल, आपेष्टा, शोषण, अत्याचार ती कवितेतून मांडू लागली. दलित स्त्रीची कविता ही क्रांतीची भाषा करणारी आहे. वास्तवाचे दर्शन घडवणारी आहे. माणूस म्हणून जगण्याची धडपड ती करू पाहत आहे. अशा जिवंत जीवनानुभवातून दलित कवित्रीची कविता साकार होत जाते. दलित कवयित्रींची परंपरा विशाल होत जाते.

**सुगंधा शेंडे**

दलित साहित्याच्या पहिल्या पिढीतील ज्येष्ठ कवयित्री म्हणून सुगंधा शेंडे होत्या. दलित कवितेतील शोषित वर्गातील त्या पहिल्या मॅट्रिक व शिक्षणतज्ज्ञ आहेत. त्यांचे 'विरतं धुकं', 'आम्रपाली भावपल्लवी' आणि 'अग्निशीखा' हे तीन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे दलित वर्गास शिक्षणाशिवाय पर्याय नाही. स्वतःची प्रगती करा अशी प्रेरणा त्यांच्या कवितेतून दिसून येते.

"असो अंगावरी चिंध्या खाईन कन्या भाकरी
घरात लावीत विद्येची पणती बोल घुमू दे तुझ्या अंतरी"[१]


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

दलितांनी गरीबी दारिद्र्य, हाल, आपेष्टा असतांनाच सुध्दा शिक्षणाचा मार्ग अवलंबला पाहिजे. त्यांनी आपली प्रगती करून घेण्यास सज्ज झाले पाहिजे. असा सूर कवितेतून येतो.

दलितांसाठी शिक्षणाची दारे खुली झाली आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाने दलितांना शिक्षण घेता आलं. सर्व दलित बांधवांनी शिक्षण घ्यावं हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला संदेश कवयित्री व्यक्त करते. कवयित्री म्हणतात,

"सुटले युगायुगाचे सुतक बांधवा
जागा हो झडकरी
अंधार लोपला भानू उदेला
आणि तुझिया घरी"[२]

देशाला स्वातंत्र्य मिळाले.शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले. दलितांना ज्या संस्कृतीने, समाजाने नाकारले होते. ते दुःख आता नष्ट झालं आहे. शिक्षणरुपी प्रकाश आता दलितांच्या जीवनात आलेला आहे. अस्पृश्यता, दारिद्र्य, विटाळ हे अंधकार मय जीवन संपुष्टात आले आहे. असे कवयित्री म्हणते.

**हिरा बनसोडे**

हिरा बनसोडे यांचा 'पौर्णिमा' (१९७०) आणि ' 'फिर्याद '(१९८४) हे काव्यसंग्रह आहेत. भारतीय संस्कृतीत स्त्रीला दुय्यम स्थान आहे. स्त्री मुक्तीसाठी कवयित्री कवितेतून विचार मांडते. शतकापासून स्त्री भोगत आलेले दुःख कवयित्री सांगते.

दलितांच्या आणि स्त्रियांच्या जीवनात भयानक दुःख आहे. जात , धर्म , रूढींचा माणसावर हल्ला झाला आहे. त्यांच्या दुःखाची तीव्र जाणीव कवितेतून व्यक्त होते. स्त्री दुःखाची विविध रूपे अनेक भावनिक पातळयावर हिरा बनसोडेंच्या कवितेतून व्यक्त होतात. स्त्री ही स्वतःच्या घरात परक्यासारखी आहे. तिला स्वतःचे अस्तित्व नाही. पिता, भाऊ, पती यांच्या दबावाखाली ती दडपली गेली आहे. तिचे स्वातंत्र्य नाकारले जाते.

रूढी परंपरा आणि जातीयता हा भारतीय संस्कृतीला लागलेला शाप आहे. दलित समाजाची मूक वेदना व्यक्त होते. दलित समाजाला सतत वेदनेची साथ आहे. बहिष्कृत म्हणून आणि स्त्री म्हणून कवित्रीच्या वाटायला आलेले अनुभव त्यांच्या कवितेतून येतात. या देशात स्त्री गुलाम आहे. इथली संस्कृती विषमतेला खतपाणी घालणारी आहे. ही तक्रार त्या कवितेतून मांडतात.

"मी माझी फिर्याद
आमच्या कर्मट संस्कृतीवर आहे
जिने आम्हाला बंद कोठडीत केंद्र केले आहे
जिथला वारा आम्हाला परक्यासारखा वागावतो
इथलं पाणी आमच्याशी मृगजळाचा जीवघेणा खेळ खेळते"[३]

कवयित्री येथील संस्कृतीवर बोट ठेवते. विषमता, अस्पृश्यता, जातिभेदाचा जोखडाने दलित समाज पिळला गेला आहे. नागवला गेला आहे. ही संस्कृती कवयित्रीला मान्य नाही कारण प्रस्थापित संस्कृती विषमतेच्या पायावर उभी आहे. स्त्रीला हजारो वर्षांपासून बंदिस्त केलेले आहे. तिचे अधिकार नाकारले आहे. संस्कृतीने निर्माण केलेला भेदभाव कवयित्रिला मान्य नाही. बहिष्कृतता, अस्पृश्यता हा समाजाचा लागलेला कलंक आता मिटला पाहिजे असा आशावाद दलित कवितेतून ठायी ठायी येताना दिसतो.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

"या संस्कृतीचे सजग पहारेकरी
पाण्याला कैद करून तळे राखता
तुझ्या स्पर्शाने होईल विषबाधा म्हणून मनात धास्तावतात
तान्हेने व्याकुळलेल्या तुला यांनी तुझाच रक्ताभिषेक केला
नि आज तुझ्या दगडी पुतळयाच्या मुखात ते पाणी ओतता आहेत
तेव्हा मात्र कमालच झाली"४

प्रस्थापित समाज व्यवस्था ही देवाच्या अस्तित्व मानते. देवानेच समाजाची निर्मिती केली आहे. अशी परंपरावाद्यांची धारणाआहे. विषमता जतन करण्याचा प्रयत्न प्रत्येक काळात झाला. पाणी हे नैसर्गिक आहे या पाण्यापासूनही दलितांना दूर ठेवण्यात आले. कवयित्री कवितेतून ईश्वराला नाकारते माणसाचे माणूसपण नाकारणारी समाजव्यवस्था कवयित्रीला मान्य नाही. दलित कवितेचा केंद्रबिंदू माणूस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह, काळाराम मंदिराचा सत्याग्रह हा दलितांना माणूसपण मिळवून देण्यासाठी दिलेला लढा आहे.

**ज्योती लांजेवार**

ज्योती लांजेवार यांचे 'दिशा' (1982) 'शब्द निळे आभाळ'' (1992)तसेच 'अजून वादळ उठले नाही' (2000) हे कवितासंग्रह प्रसिद्ध आहे त्यांची कविता इतिहासाची आठवण करून आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकते.

"उठा चवदार तळयात पाणी तुम्हाला बोलवतय साऱ्या मंदिरांची दार खुली आहेत
भीक मागून मिळालं नाही
विसरला तुम्ही पूर्वजांचे कर्तृत्व "५

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळयाच्या पाण्यासाठी, काळाराम मंदिराच्या प्रवेशासाठी लाखो अनुयायांसह लढे दिले. संघर्ष केला. तो मार्ग आपणास खुला करून दिला. इथल्या संस्कृतीने दलितांना अधिकार दिले नाहीत ते त्यांना हिसकावून घ्यावे लागले. असे वर्णन कवयित्री लांजेवार करतात. त्यांची कविता दलितांचे खरेखूरे वर्णन करणारी आहे. शतकानुशतके दलितांचा वाट्याला येणाऱ्या दुःखी, कष्टी, अपमानित, अगतिक, लाचार जीवनाचा शोध कवित्री ने घेतला आहे. कवयित्री म्हणते.

"बाबासाहेब, फाटक्या वस्त्रातली स्त्री कोणीही असो........... आपलीच वाटते मला"६

या दोन ओळीत गहन आशय आहे. दलित स्त्री अंग झाकण्यासाठी पुरेसे वस्त्र नाही हे विदारक सत्य आहे. दलित स्त्रीच्या हाल आपेष्टा कवयित्रीला खूणावत आहे. कवित्रीचे संवेदनशील मन ते टिपत आहे. संपूर्ण स्त्री जातीला आपले म्हणावे, तिचा आदर करावा यातून कवित्रीच्या वैचारिक प्रग्लभतेची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. उदात्त जीवनमूल्य कवित्रीच्या कवितेतून आविष्कृत होतात.

**मल्लिका अमरशेख**

मल्लिका अमरशेख यांचे 'वाळूचा प्रियकर' (1979) व 'महानगर' (1999) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. मल्लिका अमरशेख यांच्या काव्यातून स्त्रियांचा हूंकार येतो. कवयित्री येथील समाजव्यवस्थेवर प्रखरपणे हल्ला करते. स्त्रीने लाचारीचे जीवन न जगता आपणही माणूस आहोत ही जाणीव स्त्रीला व्हावी.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

या देशाची संस्कृती उदात्त आहेत आदर्श आहे असे म्हटले जाते. देशांच्या संस्कृतीने स्त्रीला गुलाम बनविले आहे.

**उमा गवई**

उमा गवई यांचे 'वेदनेच्या रानात' आणि 'पाचवी भिंत' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या कवितेतून स्त्री दुःख विषयीचे वर्णन आलेले आहे. स्त्रियांची होणारी घुसमट त्यांच्या जीवनात येणारे बरे वाईट अनुभव कवयित्री मांडते.

उमा गवई यांची कविता विद्रोही आहे. शोषित पिडीत स्त्रियांनी संघर्ष करावा. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या पुरुषप्रधान संस्कृतीचा नायनाट झाला पाहिजे. अशी अपेक्षा कवयित्री व्यक्त करते.

"आता तिने सावध व्हायला हवं
पौर्णिमेलाही समजून अवसेची रात्र.
तिने जागत राहायला हव
जगवायला हवा तिनेच आपला अंतरात्मा.
या सैतानी खातमा करण्यासाठी"७

स्त्रीने जागृत झाले पाहिजे. पारंपारिक समाजव्यवस्था बदलली पाहिजे. स्त्रीला माणूस म्हणून जगता यावं म्हणून तिने प्रयत्न करायला हवा. स्त्रियांनी सावध व्हावे असा संदेश कवयित्री आपल्या कवितेतून देते.

**प्रतिभा अहिरे**

कवयित्री प्रतिभा अहिरे यांचे 'मला हवी. असणारी पहाट' (1997) व 'युगांचे हुंदके' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत.

भारतीय समाज पुरुषी आणि धार्मिक परंपरानी स्त्रीला शारीरिक व मानसिक बंदिवासात टाकले. कवयित्री आपल्या कवितेतून आंबेडकरी स्त्रीवादाचे विद्रोही हुंकार साखर झाले आहेत.

"आपल्या भोळ्या हाता-हातात अशोकाचे रोप
रोमा रोमा बाबासाहेब रुतलेला अन् पायापायात सावित्रीचे बळ "८

या काव्यातून स्त्रीवादाचा विद्रोही सूर येतो. कवयित्रीचे संवेदनशील मन प्रकट होते. दलित स्त्रीमध्ये सावित्रीचे बळ आलै आहे असे ती म्हणत

**संध्या रंगारी**

संध्या रंगारी यांचै 'आघात' आणि 'कवडसे' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. कविता ही कवित्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग झाली आहे.

"पेरावत कवितेने
शब्दाच्या मातीत
बोधिवृक्षाची बीजे
प्रज्ञा शील करण्याची
गार सावली
शमून जावी विषमतेची काहिली"


Copyright © | JET Network, All Rights Reserved

कवयित्रीला समाजातील विषमता नष्ट करायची आहे. समाजात समता प्रस्थापित व्हावी. समतेवर आधारित समाज असावा. प्रज्ञा शील करुणा ही बौद्ध तत्वत्रयीचा समावेश कवितेत होतो. कविता हे समाज क्रांतीचे साधन आहे.

दलित कवित्रींच्या कवितांमधून मानवतावादी दृष्टिकोन व्यक्त होतो. कवित्रींनी स्वातंत्र्याचा जयजयकार केलेला आहे. दलित कविता मुक्तछंदात व्यक्त झालेली आहे. वैचारिक कविता आहे स्त्रीवादाची जाणीव व्यक्त होते. दलित स्त्रियांना शिक्षणाने आत्मभान आले. आत्मशोध घेत विचार, भावना, जीवनानुभव त्या कवितेतून मांडत आहेत. दलित कवितेतून आंबेडकरी तत्त्वज्ञान प्रकट होते. तत्वज्ञान दलितांना माणूसपण मिळवून देणारे आहे. दलित कवितेतून मानवतावादी सूर व्यक्त होतो. दलित कविता ही माणसाच्या अस्तित्वासाठी आहे. स्त्रीजीवनातील अनुभव संघर्ष, व्यथा, वेदना कवितेतून व्यक्त होतात. स्त्रीला एक व्यक्ती म्हणून जीवन जगता याव असा विचार दलित कवितेतून येतो. विचार, भावना आणि समाज वास्तव कविता व्यक्त करते. जून्या कालबाह्य झालेल्या रूढी, परंपरा विषमतावादी विचारसरणी, स्त्रीचे माणूस पण हिरावून घेणारा मूल्यव्यूह नष्ट व्हावा आणि नव समाज निर्मिती व्हावी व स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या इहवादी जीवन मूल्यांचा स्वीकार कवयित्री करतात. स्त्री सुध्दा एक माणूस आहे. स्त्रीला माणवी हक्क प्राप्त झाले आणि तिला तिचे माणूसपण गवसले.

दलित कवितेतून दाहकता येते. दलित स्त्रीच्या कविता या एकट्या त्या कवयित्रीच्या जीवनाशी संबंधित नाही तर दलित स्त्रियांची कविता ही संपूर्ण दलित स्त्रीयांच्या दाहक वेदनेची मांडणी करते. दलित स्त्रीच्या वाट्याला आलेला अन्याय, अत्याचार, शोषण, बलात्कार, भूकेची दाहकता, गरीबी, दारिद्रय काबाडकष्ट, मेहनत यांचे वर्णन कवयित्री कवितेतून व्यक्त करतात. दलित स्त्रीला जीवन जगण्यासाठी अहोरात्र झगडावे लागत आहे. तिचा संघर्ष अंगावर शहारे आणणारा आहे. दलित स्त्री मात्र खंबीरपणे उभी आहे. तिच्यासमोर महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरी यांच्या विचार व कार्याचा आदर्श आहे. या महापुरुषांच्या क्रांतीकारी विचारच्या दलित कवयित्रीं पाईक आहेत. या कवयित्रीना आत्मभान, समाजमा आले. आणि आत्मशोध घेत आपले विचार व्यक्त करून, व्यवस्थेवर प्रहार करत. यशाच्या दिशेने वाटचाल करतांना त्या दिसतात.

दलित कवयित्री पट हा वाढत आहे. विकसित होत आहे. अभिव्यक्तती स्वातंत्र्याने त्यांच्या मुक्या आवाजाला वाचा फुटली आहे. दलित कवयित्रीच्या कविता या वैचारिक प्रबोधन करणाऱ्या आहे. परिवर्तनाची आस धरणाऱ्या आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. शेंडे सुगंधा : 'विरतं धूकं', खेमराज प्रकाशन, नागपूर प्र. आ., १९७०
२. तत्रैव पृ. क्र. ६९
३. बनसोडे हिरा: 'फिर्यादि', समाज प्रबोधन संस्था, पुणे, १९८४, प्र. आ., पृ. ३१
४. तत्रैव पृ. ९
५. लांजेवार ज्योती: 'शब्द निळे आभाळ' संकल्प प्रकाशन नागपूर १९९२
६. तत्रैव पृ. क्र. १२.
७. उमा गवई: 'वेदनणेच्या राणात', रूपवेध प्रकाशन, परभणी, प्र. आ., 2002 पृ. क्र.४४


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

८. अहिरे प्रतिभा : 'मला हवी असणारी पहाट' इम्प्रेशन पब्लिशिंग हाऊस बेळगाव, प्र. आ. १९९७
९. रंगारी संध्या, 'कवडसे', आनंद प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ., २००२, पृ. क्र. १६


Copyright © | JET Network, All Rights Reserved